नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/05/2023 (बुधवार) सकाळ

# मोटरसायकलच्या शिटमध्ये चटई विक्रीच्या नावावर गांजाची विक्री
# ४३.५४० किलो गांजा व इतर साहित्य जप्त
# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद यांचे आदेशाने व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिनांक २४/०५/२०२३ रोजी नागपूर विभागात अवैध धंदे विरूद्ध कारवाई करीता पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन मिळाली की, मौजा चिमनाझरी शिवारातील राजस्थानी धाब्याजवळ मोटरसायकलने गांजा विक्री करीता इसम येणार आहेत प्राप्त माहितीनुसार राजस्थानी धाब्याजवळ बाजूचे मोकळया जागेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोहताच पोलीसांना पाहुन तीन इसम पळुन गेले. ते बसलेले असलेल्या ठिकाणी त्यांचे मोटरसायकलीची झडती घेतली व मोटरसायकलवर बांधलेल्या चटईची झडती घेतली असता मोटरसायकलच्या सिट व चटई मध्ये ४३.५४० किलो हिरव्या रंगाचे ओलसर गांजा किंमती ४३५४००/– रू. वाहन क्र. १) यु.पी.– ७४ ए.डी– ८९११ २) एम.एच–४० ए.वाय– ८९३९ ३) आर. जे. ०७/जी.एस– ६२८२ नमुद ठिकाणावरून तिन मोटरसायकली, ०३ मोबाईल व इतर साहित्य व ४३.५४० किलो हिरव्या रंगाचे ओलसर गांजा किंमती ४३५४००/– रूपयाचा असा एकुण ६,९१,३००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळावरून आरोपीने सोडलेले सामानामध्ये डेबिट कार्ड, वोटर आयडी कार्ड, आधार कार्ड जप्त करण्यात आले आहे. तसेच जोडे ,कपडयांच्या बॅगा जप्त करण्यात आलेल्या आहे. सदर बाबत पोलीस स्टेशन बेला येथे अनोळखी तिन आरोपीतांविरूद्ध कलम ८ (क), २० (ब) II (क) NDPS ACT 1985 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, सहायक फौजदार चंद्रशेखर घडेकर, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, दिनेश आधापुरे, पोलीस नायक अमृत किनगे, विपीन गायधने, रोहन डाखोरे, मयुर ढेकळे, चालक पोलीस शिपाई सुमित बांगडे यांच्या पथकाने पार पाडली.



## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. अरोली :- फिर्यादी नामे- राजकुमार फुलचंद थेटे, वय ३८ वर्ष, रा. रेवराल ता. मौदा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे अप. क्र. ६२/२०२० कलम ३०२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील मृतक नामे- दिगांबर जागोबाजी घुले, वय ५२ वर्ष रा. रेवराल ता. मौदा व **आरोपी नामे- मुरलीधर कानुजी ढोमणे, वय ४० वर्ष, रा. रेवराल ता. मौदा** यांचे घर एकमेकाला लागुन असुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी मृतक व आरोपी यांच्यात घरासमोरील अंगणाच्या जागेवरुन वादविवाद होवुन यातील आरोपीने मृतक यास लाकडी दांडयाने मृतकाच्या डोक्यावर, छातीवर मारुन गंभीर जखमी केले. उपचारादरम्यान मृतक हा मरण पावला.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक विवेक सोनवाने यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक २४/०५/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. देशमुख सा. यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०२ भादवि. मध्ये आजिवन कारावास व ५०००/- रु. दंड. दंड न भरल्यास ०१ महीना साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशि/१२०२ उमेश पाल पो. स्टे अरोली यांनी मदत केली आहे.

# विनयभंग करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कन्हान :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप. क्र. २३५/२०१८ कलम ३५४ (अ. ड), ३४ भादवि सहकलम ११(१), १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील पिडीता फिर्यादी ही सिलाई मशीनचे काम शिकुन कन्हान वरुन आपले घरी परत येत असता यातील आरोपी नामे– **१) मोनु उर्फ नौशाद ईदरीस शेख वय २० वर्ष रा. कांद्री २) साहील चंद्रभान चौधरी वय २१ वर्ष रा. पिपरी कन्हान ३) दयाशंकर नेमलाल पासी, वय २१ वर्ष रा. पिपरी कन्हान** यांनी पिडीतेला थांबवुन तिचे नाव गाव मोबाईल क्रमांक विचारला तेव्हा पिडीतेने नकार दिला असता आरोपीतांनी संगणमत करुन पिडीतेसोबत टॉन्टींग केले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक राजु हाके यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २४/०५/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश ए. डी. जे. पांडे सा. यांनी वरील नमुद आरोपी क्र. १ यास कलम १२ पोक्सो मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व २०००/– रु. दंड. दंड न भरल्यास २ महीने सश्रम कारावास. तसेच ३५४(ड) भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व २०००/– रु. दंड. दंड न भरल्यास २ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे तसेच ईतर दोन आरोपी यास निर्दोष रीहा करण्यात आले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशि/१४६८ सैफुल्लाह अहमद पो. स्टे कन्हान यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर